BDC LIBRARY

News Paper Clipping

A.Y. 2025-26

# महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या ज्वलंत प्रश्नांची सोडवणूक करण्याची मागणी

**पाटण, दि. ११ :** गाव तेथे ग्रंथालय ही संकल्पना मूर्त स्वरूपात आणता आलेली नाही. म्हणून या चळवळीस गती मिळावी या हेतूने महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या ज्वलंत प्रश्नांची सोडवणूक करावी, अशी मागणी पाटण तालुका ग्रंथालय संघाच्यावतीने महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना. चंद्रकांत पाटील यांच्याकडे पुणे व सातारा विभाग जिल्हा ग्रंथालय संघाचे संचालक व पाटण तालुका ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संजय इंगवले यांनी ग्रंथालयांच्यावतीने निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे, अनुदान वाढ, वर्ग बदल व नवीन ग्रंथालय मान्यता याबाबत दिलेल्या मंजुरीचे त्वरित शासन आदेश निर्गमित करावा. प्रतिवर्षी राज्यात नव्याने ग्रंथालये निर्माण व्हावीत व शासनमान्य प्रचालकांची दर्जा वाढ व्हावी यासाठी प्रस्ताव मागविण्यात येतात. मात्र २०११ पासून अनुदान प्रतीक्षेत असणाऱ्या हजारो ग्रंथालयांचे मान्यता प्रस्ताव स्थगिती असल्याने कुचंबणा होत आहे. तर शासनमान्य ग्रंथालयांची दर्जावाढ प्रस्तावही बंदच आहेत. मुख्यमंत्र्यांनी सार्वजनिक ग्रंथालय गुणवत्ता वाढावी यादृष्टीने घेतलेल्या निर्णय स्वागतार्ह आहे. मात्र मंजुरी दिलेल्या स्थगित अनुदान वाढ, वर्ग बदल व नवीन ग्रंथालय मान्यता याबाबत त्वरित आदेश निर्गमित करावा. ग्रंथालय कर्मचारी व सेवकांना निर्देशांक लक्षात घेता तत्काळ वेतन श्रेणी व अन्य सोयी सवलती मंजूर कराव्यात. राज्यातील ग्रंथालय कायदा १९६७ अन्वये सार्वजनिक ग्रंथालये, ग्रंथालय संघटना अस्तित्वात आली. परंतु शासनाने या कायद्याची अर्धवट अंमलबजावणी करून हा प्रश्न भिजत ठेवला आहे. मुळात ग्रंथालय कायदाच अपूर्ण आहे. त्यात ग्रंथालय सेवा देणाऱ्या ग्रंथालय कर्मचाऱ्यांचा उल्लेखही नाही. परिणामी इतर नोकराप्रमाणे ग्रंथालय कर्मचाऱ्यांना वेतन श्रेणी, सेवा शर्ती, निवृत्तीवेतन अथवा उपदान, रजा विषयक नियम यापैकी काहीही मिळालेले नाही. ग्रंथालयांना वर्षाकाठी जे एकूण अनुदान मिळते. त्यापैकीच अर्धा हिस्सा सेवकांच्या वेतनावर खर्च करावा एवढाच नियम केला आहे. त्यामुळे गेली ४८ वर्षे ग्रंथालयीन कर्मचारी तुटपुंज्या वेतनावर अर्धपोटी काम करत आहेत, त्यांना कोणीच वाली नाही. जिल्हास्तरीय ग्रंथालय समित्या ही गठीत करण्यात याव्यात. जिल्हास्तरावर जिल्हा ग्रंथालय समितीची प्रस्थापना करण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. मात्र आज अखेर अशा समित्याच अस्तित्वात आलेल्या नाहीत ही अनावस्था अनाकलनीय आहे. वास्तविक गोवा सरकारप्रमाणे तालुका स्तरावर शासकीय ग्रंथालय व समित्या निर्माण करण्याची गरज आहे. पुरस्कारप्राप्त ग्रंथमित्र सेवक व कार्यकर्ते यांना दलितमित्र पुरस्कारार्थीप्रमाणे सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. ग्रंथालय कार्यकर्ते व सेवकांना सरकारतर्फे पुरस्कार देण्यात येतात. त्याचे निकष सरधोपट एकच आहेत. वास्तविक या दोन वेगळ्या गोष्टी आहेत व त्यासाठी वेगवेगळे निकष शासनाने ठेवणे आवश्यक आहे. पुरस्कारार्थींना इतर पुरस्कार (दलित मित्र) प्रमाणे सेवा देवून त्यांचा सन्मान ठेवायला हवा. ग्रंथालय कर लागू करावा. शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ग्रंथालयांचे सभासदत्व अनिवार्य करावे. ग्रंथालयांना अनुदान देताना निधीची कमतरता हे कारण समोर येते. मात्र यासाठी इतर राज्याप्रमाणे ग्रंथालय कर सुरू केल्यास हा प्रश्न सुटू शकेल. शिवाय शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ग्रंथालयांचे सभासदत्व अनिवार्य केल्यास ग्रंथालयांचा निधी व वाचन संस्कृती वाढीस चालना मिळेल. तालुका ग्रंथालय संघांना मान्यता व अनुदान मिळावे. राज्यात राज्य ग्रंथालय संघ, विभाग



ना. चंद्रकांत पाटील यांना निवेदन देताना संजय इंगवले, प्रा. डी. डी. थोरात, जोतिराम जाधव, लक्ष्मण घाडगे व इतर.